-5 MAR 2017

जनसंपर्क कक्ष

लोकमत. शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पुणे, मुंबई, राहुरी संघांची आगेकूच

कोल्हापूर : अखिल महाराष्ट्र विद्यापीठ कर्मचारी 'कुलगुरू चषक टी-२०' क्रिकेट स्पर्धेत पुणे विद्यापीठ संघाने नांदेड विद्यापीठ संघाचा, तर मुंबई विद्यापीठ संघाने गोंडबाना विद्यापीठ संघाचा आणि राहुरी कृषी विद्यापीठ संघाने कोल्हापूरच्या शिवाजी विद्यापीठ संघाचा पराभव करीत आगेकूच केली.

शिवाजी विद्यापीठातील क्रिकेट पॅव्हेलियन आणि अॅथलेटिक्स मैदानावर शनिवारी हे सामने झाले. पुणे विद्यापीठ कर्मचारी संघाने नांदेड विद्यापीठ संघाचा ४७ धावांनी पराभव केला. प्रथम फलंदाजी करताना पुणे संघाने २० षटकांत ४ बाद १८२ धावा केल्या. यात नितीन प्रसादने ८२, दीपक गजरमलने नाबाद ४० धावांची झुंजार फलंदाजी केली. नांदेड संघाकडून रशीद शेखने एकाकी झुंज देत ३१, तर जयकिसन बागडीने २४ धावा करीत सामना जिंकण्याचा प्रयत्न केला. मात्र, पुणे संघातील गोलंदाजीपुढे त्यांचा टिकाव लागला नाही. पुणेकडून सुनील माटेने दोन, तर सतीश सुगावे, शिवाजी उत्तेकर, नितीन प्रसाद यांनी प्रत्येकी एक बळी घेत ४७ धावांनी विजय मिळविण्यास हातभार लावला. 'पुणे' संघाच्या नितीन प्रसादला 'सामनावीर' पुरस्कार देण्यात आला.

## 'कुलगुरू चषक टी-२०'

मुंबई विद्यापीठ संघाने गोंडबाना विद्यापीठ (गडचिरोली) संघाचा १०० धावांनी पराभव केला. प्रथम फलंदाजी करताना मुंबई संघाने २० षटकांत ८ बाद २०० धावा केल्या. यात मनोहर माने याने नाबाद ४५ धावा केल्या. गोंडबाना संघाला हे आव्हान पेलविले नाही. त्यांचा संघ १२ षटकांत सर्वबाद १०० धावांत गुंडाळला. यात सतीश सिडाम यांनी सर्वाधिक ३९ धावांची एकाकी झुंज दिली. मुंबई संघाच्या मनोहर माने यास 'सामनावीर' म्हणून गौरविण्यात आले.

राहुरी कृषी विद्यापीठ संघाने कोल्हापूरच्या शिवाजी विद्यापीठ संघावर ६४ धावांनी मात केली. प्रथम फलंदाजी करताना राहुरी संघाकडून जालिंदर घनवटे याने सर्वाधिक ११४ धावा केल्या. गोलंदाजी करताना शिवाजी विद्यापीठ संघाकडून सिद्धार्थ लोखंडेने दोन, सुनील देसाई, विशांत भोसले यांनी प्रत्येकी एक बळी घेतला. उत्तरादाखल, शिवाजी विद्यापीठ संघ ५ बाद १३० धावापर्यंत मजल मारु शकला. यात विशांत भोसले, शशिकांत दाभोळे यांनी प्रत्येकी २९ धावांची खेळी केली; तर नंदकुमार माने यांनी २८ धावा करीत मोलाची साथ दिली. मात्र, राहुरी संघाच्या भेदक गोलंदाजीपुढे त्यांचा टिकाव लागला नाही. राहुरीकडून अनिल जावणे याने दोन, तर सत्पाल गायकवाड याने एक बळी घेतला. या सामन्यात राहुरीचा जालिंदर घनवटे 'सामनावीर' ठरला.

5 MAR 2017 पुढारी जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात आज नेतृत्व कार्यशाळा

**कोल्हापूर :** भ. महावीर अध्यासन शिवाजी विद्यापीठ व दक्षिण भारत जैन सभेचे डॉ. विलास संगवे ॲकॅडमी यांच्या वतीने रविवारी शिवाजी विद्यापीठातील भाषा भवन येथे नेतृत्व कार्यशाळेचे आयोजन केले आहे. कार्यशाळेस कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, जैन सभेचे अध्यक्ष रावसाहेब पाटील उपस्थित राहणार आहेत.